
MAH/NAN/10936/2015
ISSN :2454-7905
SJF 2023 Impact Factor : 8.024

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal




(A Peer Reviewed) Vol. 2- ISSUE- LXXVI, 11 Feb 2023

## साहित्य समीक्षा व मराठी साहित्य

संपादक - प्रा. डॉ. प्रशांत भंडे

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

२९. **निवडक बाल कवितेची समीक्षा** - प्रा.सदाशिव गंगाधर चुकेवाड १२२
३०. **अंधश्रध्दा निर्मूलनार्थ संताचे कार्य** - डॉ. शिवाजी परळे १२७
३१. **'जी.ए. कथा वाङ्मयीन दृष्टीक्षेप' : आकलन आणि विश्लेषण**
- सौ. सागर गोविंदराव पांचाळ १३०
३२. **कथा वाङमय प्रकार : अण्णाभाऊंच्या कथा** - दगडूबा कोंडिबा माघाडे १३२
३३. **एका पराभूत नायकाची कहाणी - 'कोसला'** - प्रा. वंदना शामराव खोराटे १३६
३४. **धर्मराज माहूलकर यांची बालकादंबरी : एक अभ्यास** - डॉ. विनोद सिनकर, सहशिक्षक १४१
३५. **अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या व्यथा मांडणारी कादंबरी : फेसाटी** - प्रा. रश्मी दहापुते १४५
३६. **अनुवादित कादंबरी 'साक्षीदार' : एक समाजशास्त्रीय समीक्षा विचार**
- किशोर बाबुराव भगत १४८
३७. **आशा बगे यांच्या कादंबऱ्यांमधून आलेले स्त्रीचे एकाकीपण**
- प्रा. डॉ. ज्ञानेश्वर जि. भाऊ सोनवणे १५२
३८. **'गणगोत' कादंबरी एक दृष्टिक्षेप** - प्रा. डॉ. अनिता काशीनाथ सोनवणे १५६
३९. **'चरित्र' या वाङ्मय प्रकारातील कलाकृतीची समीक्षा** - प्रा. इंद्रायणी ज्ञानेश्वर सैंदाणे १५९
४०. **वि. द. घाटे यांच्या आत्मचरित्राचे आशयनिष्ठ विवेचन** - डॉ. जितेंद्र शामसिंग गिरासे १६३
४१. **पत्रकार दत्ता सराफ यांच्या 'ऐवज' आत्मचरित्राचे आकलन**
- श्री. निलेश भाऊसाहेब वाकचौरे १६६
४२. **'पार्वती एक मातृत्वधर्म' एक प्रेरणादायी आत्मकथन...** - प्रा. डॉ. संदीप वाकडे १७०
४३. **कलावंताचे स्वातंत्र्य : विशेष संदर्भ 'फ्रॅक्चर्ड फ्रीडम'** - डॉ. काळे बी. एम. १७३
४४. **सत्यशोधकीय नाटके आणि स्त्रीसमस्यांचे चित्रण** - श्रीमती दैवशाला रावसाहेब हाक्के १७६
४५. **आजच्या तरुणाईच्या नात्यातील गुंता : 'सिगारेट्स'च्या अनुषंगाने**
- विजया नारायण ठाकूर १८०
४६. **मराठी नाटकाची स्थिती गती : एक अभ्यास** - प्रा. कांबळे डी. आर १८३
४७. **मराठी नाटकातील जयंत पवार यांचे स्थान** - डॉ. पांडूरंग गावडे १८६
४८. **नटसम्राट : एक शोकांतिका** - प्रा. प्रमोद दतात्रय शेटे १८९
४९. **सत्यशोधक व्यंकटराव गोडे यांचे साप्ता. 'ब्राम्हणेतर' मधील अग्रलेख : संपादित ग्रंथाची समीक्षा** - प्रा. प्रीतम वसंतराव गावंडे १९२
५०. **'प्रश्नांची मातृभाषा' : मानवाच्या जीवनसंघर्षाचा सजग होकायंत्रच**
- प्रा. विक्रांत कृष्णाराव मेश्राम १९६

## ... विशेष संदर्भ 'फ्रॅक्चर्ड फ्रीडम'

Sonpeth Pin-431516

डॉ. काळे बी. एस.,
मराठी विभाग प्रमुख,
कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ.

अनघा लेले अनुवादीत 'फ्रॅक्चर्ड फ्रीडम' हे कोबाड गांधी यांच तुरुंगातील आठवणी व स्वातंत्र्याच्या संदर्भात चिंतन मांडणारं पुस्तक. हे मूळ इंग्रजी पुस्तक 'रोली वुक्स' तर्फे २०११ च्या मार्च महिन्यात प्रसिद्ध झालं. ते 'अमेझॉन' च्या बेस्ट सेलर च्या यादीत आलेलं. याचा मराठी अनुवाद लोकवाङमय गृहने व्यावसायिक अनुवादक अनघा लेले यांच्याकडून करुन घेतला आणि त्याची पहिली आवृत्ती नोव्हेंबर २०२१ मध्ये प्रसिद्ध झाली. पुढे महाराष्ट्र सरकारच्या संमतीने ६ डिसेंबर २०२२ चा उत्कृष्ट अनुवादाचा 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी' हा पुरस्कार या पुस्तकाला जाहीर केला. सोशल मिडीयातून काही जनांनी या पुरस्काराला विरोध केला. त्यानंतर मराठी भाषा विभागाचे मंत्री दिपक केसरकरांनी हा पुरस्कार रद्द केला. पुस्तकात नक्षलवादाचे उदात्तीकरण केल्याचा दावा मंत्री दिपक केसरकराचा आहे. त्यामुळे ज्या समितीने पुरस्काराची घोषणा केली ती निवड समितीच रद्द करण्यात आली. पुरस्कार घोषणेआधी निवड समीतीने सरकारसी चर्चा केली नाही. सरकारसी चर्चा करुनच पुरस्कार जाहीर करायला हवा असे मंत्री दिपक केसरकर म्हणाले. शिफारशीवर हस्तक्षेप न करणे व लोकाहीत परीक्षकांचा निर्णय हा अंतिम असतो. लोकशाहीवादी राष्ट्रात साहित्यिक परीक्षक खेळात पंचाचा निर्णय अंतिम असतो. शिवाय पुस्तक दोन वर्षापासून बाजारात आहे. त्यावर केंद्र आणि राज्य सरकाराची वंदी नाही. पुरस्कार हा मूळ पुस्तकाला नसून त्याच्या अनुवादाला आहे. म्हणून अनेक मान्यवर साहित्यिकांनी निषेध केला व राजीनामे दिले व पुरस्कारही परत केले. त्यात प्रज्ञा पवार यांनी महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ सदस्याचा राजीनामा दिला. 'भुरा' या आत्मचरित्राचे लेखक शरद वाविस्कर यांनी त्यांना जाहीर झालेला पुरस्कार नाकारला. साहित्यिक लक्ष्मीकांत देशमुख यांनी भाषा सल्लागार समितीच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. आनंद करंदीकरांनी त्यांच्या 'वैचारिक घुसळण' या पुस्तकाला मिळालेला पुरस्कार नाकारला. निरजा आणि लेखक हेरंब कुलकर्णी यांनीही राजीनामे दिले.

अनुवादक अनघा लेले यांनीही पुरस्कार परत घेतल्या वद्दल खंत व्यक्त केली. 'अनुवादक म्हणून मिळालेल्या पुरस्कारामुळे मला आनंद झाला होता. पण पुरस्कार आशा पद्धतीने सोल मिडीयावरील काही विरोधी मोहिमेमुळे रद्द व्हावा ही दुर्दैवाची गोष्ट आहे. पुरस्कार जर रद्द करावयाचा असेल तर त्यासाठी एक योग्य पक्रियेमधून तो रद्द केला असता तर ते योग्य ठरले असते. पुस्तकात नक्षलवादाचे समर्थन नाही. असं परखड मत अनघा लेले यांनी मांडले.

पुरस्कार परत का केला हे सांगतांना आनंद करंदीकर म्हणाले, 'आम्हीच ठरवणार आरोपी कोण, आम्हीच न्यायनिवाडा देणार आणि आम्हीच निकाल घेणार ही वृत्ती लोकाहीला घातक आणि पुस्तकाच्या संदर्भात अभिव्यक्ती स्वातंत्र्याला घातक आहे. त्यामुळे सरकारला अनेक लोकांनी सांगितल पाहिजे अस काही चालणार नाही. हे सांगण्याचा एक मार्ग असा , मी नुसता निषेध केला असता तर तुम्ही लोकांनी विशेष दखल घेतली नसती. पण एक लाखाचा पुरस्कार परत केला म्हटल्यानंतर ते जास्त दखलपात्र होत. म्हणून मी पुरस्कार परत केला.' या वरुन अनेक साहित्यिकांनी राजीनामे दिले असले तरी महाराष्ट्र राज्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष सदानंद मोरे यांनी वेगळी भूमिका मांडली आहे. या वादात आपण राजनामा देणार नाही आणि सरकारच्या विरोधात वोलणार नाही. ते म्हणाले, 'मी जो पर्यंत अध्यक्ष आहे. तो पर्यंत सरकारच्या विरोधात वोलण्याचा मला अधिकार नाही. मात्र हा निर्णय घेण्याच्या पूर्वी मंत्री महोदयांनी मला फोन केला होता. मी त्यांना सांगितल की पुरस्कार परत घेतला तर लोकांच्या प्रतिक्रिया येतील.

परंतु वहुतांश लेखकांनी हा पुरस्कार रद्द करणे हे शासनाची चुकीची गोष्ट आहे. ते निषेधार्ह आहे हे सांगण्यासाठी त्यांनी राजीनामा सत्र उगारले.

सरकारच्या विरोधात लिहतात, भूमिका घेतात त्यांना हा इशारा आहे. सरकारच्या या कृतीने कलावंतांच अभिव्यक्ती स्वातंत्र्य धोक्यात आल्याच मत अनेकांनी मांडलं.

सरकारच्याच समितीन पुरस्काराची शिफारस करावी आणि सरकारनेच ती नाकारावी अशी घटना याआधी एकोणीशे एक्याऐंशी साली

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516

प्रसारणावर बंदी होती. विनय हर्डीकरांच्या आणिबाणी विरोधातल्या 'जनांचा प्रवाहो चालिला' या पुस्तकाला आणि पुरस्कार जाहिर करण्यात आला, त्यावेळी पण सत्ताधारी कॉंग्रेसच्या अनेक साहित्यिकांनी कडाडून विरोध केला होता.

कोबाड गांधी यांच्या 'फ्रॅक्चर्ड फ्रीडम' पुस्तकाच्या निमित्ताने कलावंताच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा मुद्दा पुढे ऐरणीवर आला. कलावंत, लेखक, विचारवंत हे सर्वसामान्य माणसांपेक्षा जास्त संवेदनशील असतात. समाजात घडणाऱ्या घटनांचा सूक्ष्म अन्वयार्थ ते लावत असतात. मुळात लेखक तीन नात्याने जीवन जगत असतो. त्यात एक नाते निसर्गाशी दुसरं नातं समाजाशी आणि तिसरे स्वतःशी यावाबत बाळकृष्ण कवठेकर मधुकर पाध्ये लिहितात, 'या जगात लेखक तीन नात्यांनी जीवन जगत असतो. एक निसर्गाशी, दुसरे समाजाशी आणि तिसरे स्वतःशी हे तिसरे नाते महत्वाचे. माणसाला निसर्गाची व समाजाची जाणीव होते तीच मुळी या जाणिवेतून. लेखकाबाबत ही स्वतःची जाणीव असते. तीच निर्मिती करते. मात्र ती स्वतंत्र, स्वयंपूर्ण नाही. विश्वात लेखक ज्या समूहात असतो वाढतो त्या सामुहिक जाणिवेचा घटक असतोच'. समाजात असताना लेखकाच्या जाणिवांची जडणघडण अनेक दिशांनी होते. सामाजिक, राजकीय, धार्मिक व सांस्कृतिक प्रभावापासून तो दूर राहू शकत नाही. संत तुकारामांच्या काळात धर्माच्या आडून मानवाचे शोषण होत होते. त्यामुळेच संत तुकारामांनी 'बुडती हे जन न देखवे डोळा ॥ म्हणोनी येतो कळवळा. असे सांगत या काळाच्या योटी व्यवस्थेला शरण न जाता समाजाला जागे केले. हे करत असतांना 'सत्य असत्य मन केले ग्वाही ॥ मानियेले नाही बहुमता' बहुमताचा विचार न करता, कोणाची भीड न बाळगता शोषण करणाऱ्या व्यवस्थेवर हल्ले चढवले.

कलावंताच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर बंधन लोकशाहीवादी राष्ट्रात लादता येत नाहीत. स्वातंत्र्य, समता, बंधुता, अहिंसा ही त्यातल्या बुद्धांनी जगाला दिलेली सर्वोत्तम मानवी मूल्ये आहेत. या मानवी मूल्यांशिवाय व्यक्तीचे, कलावंताचे स्वतंत्र व्यक्तिमत्व फुलणार नाही. कलावंताच्या व्यक्तिमत्वाला, प्रतिभेला बहर येण्यासाठी ही मानवी मूल्ये समाजात रुजणे अत्यंत आवश्यक आहे. 'फ्रॅक्चर्ड फ्रिडम' या पुस्तकात कोबाड गांधी यांनी नक्षलवादाचे उदात्तीकरण केले नाही तर या देशात लोकशाहीवादी आणि न्यायपूर्ण समाज निर्माण होण्यासाठी लोकशाही स्वातंत्र्य व समता या मूल्यांचे महत्व त्यांनी प्रतिपादले आहे.

'फ्रॅक्चर्ड फ्रिडम' कोबाड गांधी लिखित पुस्तकात त्यांनी तुरुंगातील आठवणी सांगितल्या आहेत. त्यांना १७ सप्टेंबर २००९ मध्ये भारतीय कम्युनिस्ट पक्ष (माओवादी) या बंदी असलेल्या संघटनेचा सदस्य असल्यामुळे अटक झाली. आणि पुढे दहा वर्ष त्यांना कच्चा कैदी म्हणून तुरुंगात काढावे लागले. हे पुस्तक म्हणजे त्या चार दशकांच्या कार्यातील तपशिलाबद्दलच्या आणि तुरुंगातील आठवणी व चिंतनाबद्दलचा संवाद आहे. या दहा वर्षांच्या काळात देशभरातल्या पाच राज्यातल्या सात तुरुंगामध्ये एक कच्चा कैदी. (कच्चा कैदी म्हणजे ज्याच्यावर खटला चालू आहे, पण गुन्हा सिद्ध होऊन शिक्षा जाहिर झालेला नाही असा कैदी) म्हणून त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. दहा वर्ष आणि एक महिन्याच्या तुरुंगवासानंतर १६ ऑक्टोबर २०१९ ला निर्दोष त्यांची मुक्तता झाली.

या पुस्तकाचे एकूण तीन भाग आहेत. पहिल्या भागात बालपण म्हणजेच शिक्षण कुटुंबाविषयी आणि १९६९ ते २००९ पर्यंत पन्नास वर्षात केलेल्या कार्याचा धावता आढावा आहे. दुसऱ्या भागात तुरुंगातील आठवणी व तिसऱ्या भागात स्वातंत्र्याच्या संदर्भात चिंतन आहे. कोबाड गांधी यांचा जन्म एका पारसी मध्यमवर्गीय कुटुंबात झाला होता. त्यांचे वडील चार्टर्ड अकाउंटंट होते. त्यांचे शिक्षण सेंट मेरीज स्कुल, मुंबई आणि डून स्कूल डेहराडून येथे झाले. मुंबई येथे १९६८ मध्ये रसायनशास्त्रातील पदवी घेतल्यानंतर चार्टर्ड अकाउंटंट म्हणून पात्रता मिळविण्यासाठी ते लंडनला गेले. मात्र तिथे वर्णद्वेषी अनुभव आल्यामुळे तेथील भारतीयांना स्वाभिमानाचे स्थान मिळवून देण्यासाठी ते लढ्यात सहभागी झाले. त्याच ठिकाणी ते डाव्या चळवळीकडे वळले. अशाच एका निदर्शनाच्या वेळी पोलीसांनी त्यांना अटक केली. त्यामध्ये त्यांना तीन महिने तुरुंगवासाची शिक्षा झाली. लंडनमध्ये तीन महिने तुरुंगवास भोगल्यानंतर त्यांच्या जीवनाला कलाटणी मिळाली. चार्टर्ड अकाउंटंट बनण्याचे स्वप्न अधुरे सोडून ते भारतात १९७२ मध्ये परतले. त्यानंतर त्यांनी भारतातील शोषित, वंचित, समुहासाठी आपले आयुष्य खर्च करायचे ठरवले.

त्यानंतर चाळीस वर्ष त्यांनी गरीबासाठी आपले आयुष्य समर्पित केले. मार्क्सवादी नेहमीच समाजातील सर्वात शोषित घटकांच्या बाजूचे असतात. समतावादी अर्थव्यवस्थेचे पुरस्कर्ते असतात त्यामुळे त्यांच्याशी संबंध येत गेल्याचे ते सांगतात. त्यांनी सुरुवातीला मुंबई येथे 'प्रोग्राम' या संघटनेच्या माध्यमातून गरीबांसाठी कार्य केले. आणिबाणीच्या काळातील अत्याचार, नसबंदी, विरोधी पक्षांच्या संघर्ष, दलित पँथरचा संघर्ष, या माध्यमातून ते वंचित लोकांसाठी लढत राहत.त. या कामात त्यांची पत्नी अनुराधाही त्यांना मदत करते. कोणत्या गुणांमुळे आणि मूल्यांमुळे अनू आदर्श कार्यकर्ता ठरते हे सांगतांना ते लिहितात, 'तिचा सरळ स्वभाव, जबाबदारीचे भान, बरोबरच्या माणसांप्रति असलेले प्रेम, हातात घेतलेल्या कोणत्याही कामाचा ध्यास घेणे, पितृसत्ता किंवा जातीव्यवस्था यांच्याबद्दलचा तिरस्कार, छोट्या प्रश्नांमध्येही न्यायाची बाजू घेऊन लढणे. अनू म्हणजे खरोखर सत्याची प्रतीक होती. दिखाऊपणा, ढोंगीपणा, फसवणूक, लबाडी, चालाखी अशा गोष्टींना तिच्या स्वभावात थारा नव्हता

नसे'. आपल्या पत्नीकडे लेखकाचा पाहण्याचा दृष्टिकोन किती उच्च कोटीचा होता हे यावरून लक्षात येते.

आपल्याकडे स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन दोन टोकाचा आहे. एका टोकाला पाश्चात्त्य संस्कृतीशी जोडलेल्या बाजारू स्त्रियांच्या मुक्तीचा पुरस्कार केला जातो. तर दुसऱ्या टोकाला तिचे विरोधक 'मातेच्या प्रतिमेची' किंवा 'सती-सावित्री' संस्कृतीचा पुरस्कार करीत, बाजू स्त्रियांचे वस्तुकरण करणाऱ्या ठरतात. लेखकाचा दृष्टिकोन मात्र स्त्रियांच्या स्वतःच्या भावभावना व हक्कांचा आदर करणारा ठरतो. देशातील शोषित लोकांच्या हक्कासाठी अनुराधा शेवटपर्यंत लढत राहिली. याच कामामध्ये तिचा मृत्यू झाला. भारतीय जनता आणि लोकशाहीवादी क्रांतीचे कार्य करताना ती शहीद झाल्याचे ते नमूद करतात.

दुसऱ्या भागात एक दशक भारतातील विविध तुरुंगातील जीवनाबद्दल त्यांनी लिहिले आहे. याकाळात तुरुंगात भेटलेल्या चित्रविचित्र लोक, घोटाळेबाज, दहशतवादी, काश्मिरी, क्रांतीकारी, सामाजिक कार्यकर्ते, गुंड लोक आणि न्यायालयीन लढ्याचे अंगावर काटा आणणारे प्रसंग त्यांनी सांगितले आहेत. दहशतवादी अफझलगुरु, फाशीची शिक्षा झालेला खलिस्तानी नेता देविंदर पाल सिंग भुल्लर, दिल्लीतील गँग डॉन, किशन पहेलवान यांच्या सोबत त्यांना तिहार तुरुंगात रहावे लागले. दहा वर्षांपैकी पावणेसात वर्षे तिहारमध्ये, जवळजवळ एक वर्ष हैद्राबाद तुरुंगात, एक महिना पतियाळा तुरुंगात, सहा महिने विशाखापट्टणम तुरुंगात, पावणेदोन वर्षे झारखंडमधील तुरुंगात, आणि शेवटचे दोन महिने सुरत तुरुंगात कस्टडीमध्ये काढली. तिहारच्या तुरुंगाबद्दल ते लिहितात, 'तुम्ही अगदीच संवेदनशील असाल किंवा गेंड्याच्या कातडीचे असाल तरच तिहारच्या तुरुंगात तुमचा निभाव लागू शकतो. नाहीतर हा तुरुंग तुम्हाला ध्वस्त करण्यासाठीच बनलेला आहे. एक व्यक्ती म्हणून कैदयाला कैद्यांना शून्य अधिकार आहेत. 'प्रोटेस्ट ग्रंथीसंबंधी गंभीर आजार, अस्थिरोग व रक्तदाबाचा आजार सहन करत त्यांनी दहा वर्षे जेलमध्ये काढले मानसिक स्वास्थ टिकवण्यासाठी अभ्यास व लिखाणावर लक्ष केंद्रित करत ते जीवन जगले.' दहा वर्षे भारतातल्या विविध तुरुंगामध्ये शारीरिक त्रास सोसावे लागलेल्या कोबाड यांनी त्यांच्या या दीर्घ तुरुंगवासाबद्दल, त्यांच्याबरोबर तुरुंगात असलेल्या कैद्यांबद्दल, काफ्काच्या काल्पनिक जगातले वाटावेत अशा भारतीय कायदा व्यवस्थेच्या अनुभवांबद्दल लिहिले आहे. एक अन्याय व्यवस्था एका शूर, धैर्यवान माणसालाही कशी दुबळी बनवते त्याचे हे प्रामाणिक आणि आडपडदा न ठेवता लिहिलेले वर्णन यात आहे.'

तिसऱ्या भागात मानवी जीवनासाठी लोकशाही, मार्क्सवाद, साम्यवाद व आणखी कोणती व्यवस्था योग्य राहील व स्वातंत्र्यानंतरचा भारत या अनुषंगाने चिंतन आहे. जगभर राजकीय वर्ग अधिकाधिक अशिष्ट, अक्षम, असंस्कृत आणि फॅसिस्ट प्रवृत्तीचा होत चाललेला आहे. येता काळ लोकांसाठी कल्पनाही करता येणार नाही इतका भयंकर असणार आहे. साठच्या दशकात कम्युनिझमची मोठी लाट होती. त्यावेळी लेखक त्याकडे आकर्षित झाले होते. पण आज साम्यवाद जवळजवळ संपुष्टात आलेला आहे. भांडवलशाहीच साम्राज्य आहे. खाऊजा धोरणामुळे भांडवलदार गब्बर होत आहेत. सामान्य माणसाच शोषण मोठ्या प्रमाणावर होत आहे. 'भांडवलशाहीचा एक ओबडधोबड आकृतीबंध जगभर जनतेला आणि पर्यावरणालाही लुटत चालला आहे, आणि त्याच्या वाटेत येणारी प्रत्येक गोष्ट नष्ट करत आहे. अगदी मानवी स्वभाव आणि संवेदनासुद्धा विकृत होत आहेत.' अशा काळात त्यांना भक्ती संप्रदायात संतांनी हृदयात बाळगलेल्या चांगल्या नीतीमूल्याचा स्वीकार करणे योग्य वाटते. आनंद, स्वातंत्र्य आणि नवीन नीतीमूल्य त्यांनी सांगितली आहेत.

'स्वातंत्र्य' 'चांगली मूल्ये' आणि आनंद या मुद्याची महान तत्वज्ञ, संत आणि समाजसुधारकांनी पुन्हा पुन्हा चर्चा केली आहे. त्यामुळे याचा अंगीकार करण त्यांना महत्वाच वाटत. पण वास्तव भयावह आहे. याबाबत डॉ. भालचंद्र कानगो म्हणतात, 'भारतीय लोकशाहीत स्वातंत्र्य या संकल्पनेला महत्व आहे. परंतु स्वातंत्र्यानंतर देशात जनचळवळी करणाऱ्यांना या स्वातंत्र्याविषयी येणारा अनुभव अस्वस्थ करणारा आहे व त्यामुळेच हे स्वातंत्र्य कसे खंडित व मर्यादित होत आहे याचे वर्णन 'फ्रॅक्चर्ड फ्रीडम' या पुस्तकात आहे.

कलावंताचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य हा अत्यंत महत्वाचा मुद्दा असून व्यवस्थेच्या विरोधात जर कोणी बोलत असेल व त्यावर कुणी बंदी घालत असेल तर ते लोकशाहीला घातक आहे. शहरी नक्षलवादाच्या नावाखाली परीवर्तनाच्या चळवळी दडपणे लोकशाहीवादी राष्ट्रात एकूणच मानवी मूल्य पायदळी तुडवल्या सारखे आहे. डावी विचारसरणीला विरोध करुन उजवी विचारसरणी लादणे हे मानवी हीतासाठी योग्य नव्हे.


संदर्भ ग्रंथ :

१) फ्रॅक्चर्ड फ्रिडम - कोबाड गांधी

२) समाज आणि साहित्य समीक्षा - यशवंत मनोहर

३) निळी क्षितिजे - रा.ग. जाधव

४) चिंतनयात्रा - डॉ. जनार्दन वाघमारे.


PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani